राष्ट्रोत्कर्षाय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

कालमर्यादा – ०३/०३/२०२२

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/पदोन्नती/२०२२/ 885

दिनांक 25 FEB 2022

प्रति,

संचालक/ प्राचार्य,
सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये/शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

विषय – तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक व प्रशासकीय सेवा गट अ या संवर्गातील प्रशासकीय अधिकारी/उपसचिव(अतां) ही पदे पदोन्नतीने भरण्याबाबत

संदर्भ १.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२ दि.०१/०८/२०१९
२.मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.४/आस्था/प्रशा.अधि./पदोन्नती/२०२२/१३८ दिनांक २४/०२/२०२२

उपरोक्त विषयांकित संदर्भ क्र.२ च्या मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्राचे अवलोकन करुन आपल्या संस्थेतील प्रबंधक//सहाय्यक संचालक (अतां)/कक्ष अधिकारी इ.समकक्ष पदावर कार्यरत असलेल्या अधिका-यांची माहिती संदर्भ क्र.१ मधील परिशिष्ट २ - जोडपत्र ब,क व ड मधील विवरणपत्रांत अचूक भरुन दिनांक ०३/०३/२०२२ पर्यंत आवश्यक सहपत्रांसह व्दिप्रतीत या कार्यालयांस सादर करावी.

माहिती तयार करतांना New Microsoft Excel Worksheet DV-TTNatraj Font मध्ये तयार करावी.

(डॉ.दत्तात्रय व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२- ६८५९७४७३,४०४
ई-मेल-desk4@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : ४/आस्था/प्रशा.अधि/पदोन्नती/२०२२/ ९३८ दिनांक : 24 FEB 2022

गोपनीय

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
बांद्रा, मुंबई ५१.

विषय: तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक व प्रशासकीय सेवा गट अ या संवर्गातील प्रशासकीय अधिकारी/उपसचिव (अतां) ही पदे पदोन्नतीने भरण्याबाबत.

संदर्भ : सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि. १/८/२०१९.

उपरोक्त विषयाबाबत संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक व प्रशासकीय सेवा गट अ या संवर्गातील प्रशासकीय अधिकारी /उपसचिव (अतां) ही पदे तसेच आगामी वर्षभरात नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणारी पदे विचारात घेऊन संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील/संस्थांमधील प्रबंधक पदावर कार्यरत असलेल्या अधिका-यामधून पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही करावयाची आहे.

त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील संस्था/आस्थापनांवर प्रबंधक/सहाय्यक संचालक (अतां)/कक्ष अधिकारी इ.समकक्ष पदावर कार्यरत असलेल्या अधिका-यांची माहिती संदर्भाधिन शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट २ मधील जोडपत्र ब,क व ड मधील विवरणपत्रात अचूक माहिती भरुन दि. १०/३/२०२२ पर्यंत सादर करण्यात यावी. तसेच संबंधित कर्मचा-यांचे सन २०१५-१६ ते अद्यापर्यंत या कालावधीचे पुनर्विलोकित गोपनीय अहवालाच्या साक्षांकित प्रती सादर कराव्यात.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई